# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवाना अटी) विनियम, २००४

## विद्युत अधिनियम, २००३

क्र. मविनिआ/लिगल/१११/२००४/१०८९ - विद्युत अधिनियम, २००३ (२००३ चा ३६) मधील कलम १८१ च्या उप-कलम (२) चा खंड (b) सह कलम १५ चे उप-कलम (१), कलम १८१ च्या उप-कलम (२) चा खंड (c) सह कलम (१५) चे उप-कलम (२), कलम १८१ च्या उप-कलम (२) चा खंड (d) सह कलम १६, कलम १८१ च्या उप-कलम (२) चा खंड (e) सह कलम १८च्या उप-कलम (२) चा खंड (a) आणि कलम १८१च्या उप-कलम (२) चा खंड (f) सह कलम १८च्या उप-कलम (२) चा खंड (c) आणि कलम १८१च्या उप-कलम (२) चा खंड (zp) अन्वये प्रदान करण्यांत आलेल्या अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, याद्वारे खालील विनियम करीत आहे.

## प्रकरण १: सर्वसाधारण

### १ संक्षिप्त नांव, व्याप्ती व प्रारंभ

(१) या विनियमांस "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवाना अटी) विनियम, २००४" असे म्हणावे.

(२) हे विनियम सबंध महाराष्ट्र राज्यास लागू राहतील.

(३) हे विनियम शासकीय राजपत्रातील त्यांच्या प्रसिध्दीच्या दिनांकापसून अंमलात येतील.

### २. विनियम कौणाला लागू असतील

हे विनियम प्रसिध्द होण्याच्या तारखेस आयोगापुढे परवान्यांसाठी प्रलंबीत असलेल्या अर्जांसह सर्व अर्जांना आणि अधिनियमाखालील सर्व परवान्यांना हे विनियम लागू राहतील.

### ३. व्याख्या

या विनियमांत, संदर्भानुसार वेगळा अर्थ अपेक्षित नसेल तर -

(अ) **"लेखा विवरणपत्र"** म्हणजे प्रत्येक आर्थिक वर्षाकरिता परवानाप्राप्त उद्योग़ आणि इतर उद्योगांकरिता वेगवेगळी तयार केलेली व खालील बाबींचा समावेश असलेली लेखा विवरणपत्रे -

(१) कंपनी अधिनियम, १९५६ च्या अनुसूची ६च्या भाग १ मधील मधील नमुन्याप्रमाणे तयार केलेला ताळे-बंद;

(२) कंपनी अधिनियम,१९५६ च्या अनुसूची ६च्या भाग २ मधील मधील अटींची पुर्तता करुन तयार केलेले नफा-तोटा पत्रक;

(३) भारतीय सनदी लेखापाल संस्थेच्या रोकड आवक (cash flow) विवरणपत्रासाठी असलेल्या लेखा प्रमाणांवर (AS-3) आधारित तयार केलेले रोकड आवक विवरणपत्र;

(४) वितरण परवानाधारकाच्या वैधानिक लेखापरिक्षकाचा अहवाल;

(५) कंपनी अधिनियम, १९५६ च्या कलम २०९(१)(डी) खाली केंद्र शासनाने विहीत केलेले खर्चाचे अभिलेखे.

यांसह त्यासंबधीच्या टिपण्या, व आयोग वेळोवळी निदेश देईल त्यानुसार इतर सहाय्यक विवरणपत्रे व माहिती.

(ब) **"वाटप विवरणपत्र"** म्हणजे प्रत्येक आर्थिक वर्षासाठी वितरण परवानाधारकाच्या प्रत्येक स्वतंत्र उद्योगासाठी तयार करण्यांत आलेले एक विवरणपत्र ज्यांत, दाखविण्यांत आलेला महसूल, खर्च, मालमत्ता,दायित्वे, राखीव निधी किंवा तरतूद जी-

(१) इतर कोणत्याही उद्योगांना किंवा उद्योगांकडून खर्ची टाकण्यांत आली आहे व ज्या आधारे ती खर्ची टाकण्यांत आली त्याचा तपशील, किंवा

(२) वितरण परवानाधारकाचा वितरण उद्योग व इतर कोणताही उद्योग़ यांमध्ये विभाजनाने किंवा वाटप करुन ठरविण्यांत आली आहे व असे विभाजन किंवा वाटप ज्या आधारे करण्यांत आले त्याचा तपशील, देण्यांत आला आहे;

(क) **"अधिनियम"** म्हणजे विद्युत अधिनियम, २००३ (२००३ चा ३६);

(ड) **"अर्जदार"** म्हणजे अधिनियमाखाली आणि या विनियमांना अनुसरुन वीजेच्या वितरणाकरिता परवाना मिळण्यासाठी ज्याने अर्ज केला आहे अशी व्यक्ति;

(इ) **"मंडळ"** म्हणजे विद्युत पुरवठा अधिनियम, १९४८ (१९४८ चा ५४) च्या कलम ५ मधील उप-कलम (१) खाली घटीत करण्यांत आलेले महाराष्ट्र राज्य विद्युत मंडऴ;

(फ) **"आयोग"** महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग;

(ग) **"कामकाज चालविणे विनियम"** म्हणजे अधिनियमाच्या कलम १८१ च्या उप-कलम (२) च्या खंड (z) सह कलम ९२ च्या उप-कलम (१) नुसार विनिर्दिष्ट करण्यांत आलेले विनियम;

(ह) **"परवाना"** म्हणजे वितरण परवानाधरकाच्या पुरवठ्याच्या क्षेत्रांतील ग्राहकांना वीज पुरविण्यासाठी वितरण यंत्रणा कार्यान्वित ठेवण्याकरिता व सुव्यवस्थित राखण्याकरिता अधिनियमाच्या कलम १४ खाली देण्यांत आलेला परवाना;

(ईः) **"परवानाप्राप्त उद्योग"** म्हणजे वितरण परवानाधरकाच्या वीज पुरवठ्याच्या क्षेत्रातील ग्राहकांना वीज पुरविण्यासाठी वितरण यंत्रणा कार्यान्वित ठेवण्याचा व सुव्यवस्थित राखण्याचा उद्योग.

(ज) **“नेटवर्क उभारणीची योजना”** म्हणजे वितरण परवानाधरकाची किंवा अर्जदाराची प्रस्तावित वितरण यंत्रणा, जसे असेल तसे, कशी पसरली आहे ते दाखवणारा आराखडा ज्यांत अशा वितरण यंत्रणेची भौगोलिक व्याप्ति, टप्प्या-टप्प्याने होणारी वाढ व आयोगास आवश्यक असणारा असा इतर तपशील समाविष्ट असेल.

(त) **“अधिकारी”** म्हणजे आयोगाचा अधिकारी;

(ल) **“इतर उद्योग”** म्हणजे अधिनियमाच्या कलम ५१ मध्ये उल्लेख करण्यांत आलेला असा इतर उद्योग;

(म) **“प्रवर्तक”** म्हणजे, या विनियमांख़ालील अर्जदाराच्या संदर्भात, -

(१) जर अर्जदार भागिदारी संस्था असल्यास, भागिदारी संस्थेचा कोणताही भागिदार;

(२) जर अर्जदार ही कंपनी किंवा बॉडी कॉर्पोरेट संस्था असेल तर अशा कंपनीच्या किंवा बॉडी कॉर्पोरेट संस्थेच्या भरणा झालेल्या सम भाग भांडवलापैकी दहा (१०) टक्क्यांपेक्षा कमी भाग धारण न करणारा कोणताही भागधारक;

(३) जर अर्जदार ही व्यक्तींची संघटना किंवा संस्था असेल तर तिची सभासद असलेली कोणतीही व्यक्ति.;

(न) **“सचिव”** म्हणजे आयोगाचा सचिव.

यांत वापरलेले आणि व्याख्या न केलेले शब्द किंवा शब्दप्रयोग यांना अधिनियमांत नमूद केल्यानुसार अर्थ राहील.

## प्रकरण २: कार्यपध्दतीविषयक बाबी

### ४. परवाना मिळण्यासाठी करावयाचा अर्ज

४.१ परवाना प्राप्तीसाठी करावयाचा अर्ज अनुसूची १ मध्ये विहीत करण्यांत आलेल्या नमुन्यामध्ये आणि कागदपत्रे व माहितीसह करण्यांत येईल.

४.२ वरील विनियम ४.१ खालील अर्ज, अधिनियमाच्या कलम १५ च्या उप-कलम (१) मध्ये विहीत करण्यांत आलेल्या शुल्कासह, करण्यांत येईल.

४.३ वरील विनियम ४.१ खालील अर्ज, अर्जदाराकडून स्वाक्षरी करण्यांत येईल आणि सचिवाकडे पाठविण्यांत येईल व तो कामकाज चालविण्याच्या विनियमांमध्ये याचिका सादर करण्यासाठी घालून दिलेल्या पध्दतीनुसार सादर करण्यांत येईल.

## ५. अर्जाची छाननी

५.१ आयोग किंवा सचिव किंवा आयोगाने त्याप्रित्यर्थ पदनिर्देशीत केलेला कोणाताही अधिकारी, अर्जाची छाननी केल्यानंतर आणि जेथवर व्यवहार्य असेल तेथवर, अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीस (३०) दिवसांच्या आंत, अर्जाचा विचार करण्यासाठी आवश्यक वाटणारी अतिरिक्त माहिती किंवा तपशील किंवा कागदपत्रे, अर्जदारास सादर करण्यास भाग पाडू शकेल.

५.२ अर्ज पूर्ण झाल्यावर आणि त्यास सर्व आवश्यक ती माहिती, तपशील व कागदपत्रे जोडण्यांत आल्यावर आणि अर्जाद्वारे सर्व अटींची पूर्तता झाल्यावर, आयोग किंवा सचिव किंवा आयोगाने त्याप्रित्यर्थ पदनिर्देशीत केलेला कोणताही अधिकारी, अधिनियमांत आणि लागू असणा-या विनियमांत तरतूद केलेल्या कार्यपध्दतीनुसार विचार करण्यासाठी अर्ज तयार असल्याचे अर्जदारास कळवेल.

## ६. परवाना मिळण्यासाठी अर्जाची नोटीस

६.१ अर्जदार परवाना मिळण्यासाठी त्याच्या अर्जाबाबतची नोटीस, पुरववठ्याच्या प्रस्तावित क्षेत्रांतील इंग्रजी भाषेतील कमीत कमी दोन (२) वर्तमानपत्रांत आणि दोन (२) मराठी भाषेतील वर्तमानपत्रांत प्रसिध्द करेल.

६.२ अधिनियमांतील कलम १५ च्या उप-कलम (२) नुसार अर्जाच्या नोटीशीमध्ये खालील बाबींचा तपशील असेल :

(अ) अर्जदाराचे नांव व नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता;

(ब) अर्ज केलेल्या परवान्याचे स्वरुप व अर्जाची ठळक वैशिष्ट्ये;

(क) अर्जदाराचा कायदेशीर दर्जा, धारण केलेले भाग, व्यवस्थापनाची माहिती, कामकाजाचा गोषवारा आणि अशाच प्रकारच्या कामातील मागील अनुभव;

(ड) प्रस्तावित पुरवठ्याचे क्षेत्र;

(इ) संबंधित, मुख्य शहरातील / नगरांतील अर्जदाराच्या नियंत्रणाखालील व्यक्तिचे (व्यक्तींची) नांवे, पत्ते व इतर आवश्यक तपशील, ज्यांच्याबरोबर अर्जाची आणि इतर कागदपत्रांची तपासणी करता येईल किंवा ज्यांच्याकडून ती, फोटोकॉपी करण्यासाठी येणा-या खर्चापेक्षा जास्त नसेल इतकी रास्त किंमत देऊन, व्यक्तिशः किंवा पोस्टाद्वारे खरेदी करता येतील, आणि अर्जदाराच्या वेब-साइटचा पत्ता जेथून अर्ज आवश्यक त्या इतर कागदपत्रांसह विनामूल्य उतरवून (download) घेता येईल.

(फ) अधिनियमाच्या कलम १४ च्या सहाव्या परंतुकाखाली येणा-या प्रकरणासाठीच्या परवान्यासंदर्भात अधिनियमाच्या त्या तरतूदीखाली केंद्र शासन विहीत करेल त्या सर्व अटींची पूर्तता केली असल्याचे निवेदन; आणि

(ग) आयोगाकडे केलेल्या अर्जाच्या संदर्भांत कोणतीही हरकत घेण्यास इच्छयुक असणारी कोणीही व्यक्ति, अधिनियमाच्या कलम १८च्या उप-कलम (२) च्या खंड (i) मध्ये करण्यांत आलेल्या तरतूदीत विहीत केलेल्या काल-मर्यादेत, त्यासाठी सचिवाला एक लेखी सूचना (सहा प्रतीत) पाठव शकेल, याबाबतचे निवेदन.

परंतु असे की, अर्ज प्राप्त झाल्यापसून चार (४) दिवसांच्या आंत, प्रकरणाची विशिष्ट परिस्थिती लक्षांत घेऊन आयोगास उचित वाटेल असा अतिरिक्त तपशील नोटिशीत समाविष्ट करण्यास आयोग सांगू शकेल.

## ७. परवान्यांतील सुधारणेबाबत नोटीस

७.१ अधिनियमाच्या कलम १८च्या उप-कलम (२) च्या खंड (a) नुसार पुरवठ्याच्या क्षेत्रांतील इंग्रजी भाषेतील कमीत कमी (२) वर्तमानपत्रांत आणि दोन (२) मराठी भाषेतील वर्तमानपत्रांत एक नोटीस प्रसिध्द करण्यांत येईल.

७.२ अर्जांत बदल किंवा सुधारणा करण्यासाठी केलेल्या अर्जाच्या दिनांकापासून सात (७) दिवसाच्या आंत नोटीस प्रसिध्द करण्यांत येईल व त्यांत खालील तपशील असेल :

(अ) वितरण परवानाधारकाचे नांव व पुरवठ्याच्या क्षेत्रांतील मूख्य कार्यालयाचा पत्ता;
(ब) आयोगाकडे करण्यांत आलेल्या अर्जातील बदल किंवा सुधारणांचा तपशील;
(क) प्रस्तावित बदल किंवा सुधारणांची तर्कसंगत कारणमिमांसा व त्यामुळे बाधित होण्याची शक्यता असणा-या व्यक्ती;
(ड) संबंधित मुख्य शहरातील / नगरांतील वितरण परवानाधारकाच्या नियंत्रानाखाली काम करणा-या व्यक्तिचे (व्यक्तींची) नांवे, पत्ते व इतर आवश्यक तपशील, ज्यांच्याबरोबर अर्जाची आणि इतर कागदपत्रांची तपासणी करता येईल किंवा ज्यांच्याकडून ती, फोटोकॉपी करण्यासाठी येणा-या खर्चापेक्षा जास्त नसेल इतक्या रास्त किंमतीत, व्यक्तिशः किंवा पोस्टाद्वारे खरेदी करता येईल, आणि वितरण परवानाधारकाच्या वेब-साइटचा पत्ता जेथून अर्ज आवश्यक त्या इतर कागदपत्रांसह विनामूल्य उतरवून (download) घेता येईल.
(इ) आयोगाकडे केलेल्या अर्जाच्या संदर्भांत कौणतीही सूचना करण्यास किंवा हरकत घेण्यास इच्छयुक असणारी कोणीही व्यक्ति, अधिनियमाच्या कलम १८च्या उप-कलम (२) च्या खंड (d) मध्ये करण्यांत आलेल्या तरतूदीत विहीत केलेल्या काल-मर्यादेत, त्यासाठी सचिवाला एक लेखी सूचना (सहा प्रतीत) पाठवू शकेल, याबाबतचे निवेदन.

परंतु असे की, अर्ज प्राप्त झाल्यापसून चार (४) दिवसांच्या आंत, प्रकरणाची विशिष्ट परिस्थिती लक्षांत घेऊन आयोगास उचित वाटेल असा अतिरिक्त तपशील नोटिशीत समाविष्ट करण्यास आयोग सांगू शकेल.

७.३ अधिनियमाच्या कलम १८च्या उप-कलम (२) च्या खंड (c) नुसार द्यावयाच्या नोटीशीत खालील तपशील असेल :

- (अ) वितरण परवानेधारकाचे नांव आणि पुरवठ्याच्या क्षेत्रातील मुख्य कार्यालयाचा पत्ता;
- (ब) आयोगाने करावयाच्या प्रस्तावित बदल किंवा सुधारणेचे स्वरुप;
- (क) प्रस्तावित बदल किंवा सुधारणांची तर्कसंगत कारणमिमांसा व त्यामुळे बाधित होण्याची शक्यता असणा-या व्यक्ती;
- (ड) आयोगाकडे केलेल्या अर्जाच्या संदर्भांत कोणतीही सूचना करण्यास किंवा हरकत घेण्यास इच्छयुक असणारी कोणीही व्यक्ति, अधिनियमाच्या कलम १८ च्या उप-कलम (२) च्या खंड (d) मध्ये करण्यांत आलेल्या तरतूदीत विहीत केलेल्या काल-मर्यादेत,त्यासाठी सचिवाला एक लेखी सूचना (सहा प्रतीत) पाठवू शकेल, याबाबतचे निवेदन.

## ८. अर्जावरील प्रक्रिया

या विनियमांखाली करण्यातं आलेल्या अर्जावर प्रक्रिया करतांना कामकाज चालविणॆ विनियमांत घालून देण्यांत आलेली कार्यपध्दती आयोग अवलंबेल.

## ९. परवान्याचा नमूना

अधिनियमाच्या कलम १५च्या उप-कलम (६)च्या खंड (a) खाली देण्यांत आलेला परवाना या विनियमांच्या अनुसूची २ मध्ये विहीत करण्यांत आलेल्या नमुन्याप्रमाणे असेल.

परंतु असे की, परवान्यासाठी विहीत करण्यांत आलेल्या नमुन्यामध्ये आयोग त्यास स्वमते आवश्यक वाटेल अशी भर घालू शकेल अथवा बदल किंवा सुधारणा करु शकेल .

## १०. छापील प्रती देणे

१०.१ ज्या व्यक्तीस परवाना देण्यात आला आहे अशी व्यक्ति परवाना दिल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आंत अशा परवान्याची एक प्रत पुरवठा क्षेत्र रेखांकन करुन दाखविणारा नकाशा किंवा नकाशे यांच्यासह पुरवठा क्षेत्रात असलेल्या त्याच्या प्रधान कार्यालयांत तपासणीसाठी जनतेस कार्यालयीन वेळेत उपलब्ध करुन देईल.

१०.२ परवाना दिल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आंत, असा प्रत्येक परवानाधारक, परवान्याच्या छापील प्रती संबंधित नकाशा किंवा नकाशे यांच्यासह, कोणत्याही व्यक्तीस जी त्याच्या मागणीसाठी अर्ज करेल तिला फोटोकॉपीपेक्षा जास्त खर्च येणार नाही इतक्या रास्त किंमतीस, उपलब्ध करुन देईल.

## ११. मानीव परवानेधारक

११.१ अधिनियमाचा प्रारंभ झाल्याच्या दिनांकापासून एक वर्ष झाल्यानंतर (प्रभावी दिनांकापासून), अधिनियम व त्याखाली करण्यांत आलेले नियम व विनियमांतील तरतूदी, अधिनियमाच्या कलम १४ मधील प्रथम परंतुकाखालील (proviso) मानीव परवानाधारकाला लागू होतील :

परंतु असे की, या विनियमांतील प्रकरण ३ मध्ये विनिर्दिष्ट करण्यांत आलेल्या परवान्याच्या अटी प्रभावी दिनांकाच्या दिवशी असलेल्या अशा मानीव परवानाधारकाच्या परवान्यातील सर्वसाधारण अटी असल्याचे मानण्यांत येईल :

तथापि असे की, अशा मानीव परवानाधारकाच्या परवान्यांचा कालावधी हा अशा परवानाधारकाला रद्द केलेल्या कायद्यांखाली किंवा अधिनियमासोबतच्या अनुसूचीत नमूद अरण्यांत आलेल्या अधिनियमांखाली दिलेला परवाना, मंजूरी किंवा मान्यतेमध्ये नमूद केलेला कालावधी असेल आणि जेथे कालावधी नमूद करण्यांत आलेला नाही, अशा मानीव परवानाधारकांच्या परवान्यांचा कालावधी हा अधिनियामाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून पंचवीस (२५) वर्षे राहील :

परंतु आणखी असे की, अशा मानीव परवानाधारकाला रद्द केलेल्या कायद्यांखाली किंवा अधिनियमासोबतच्या अनुसूचीत नमूद अरण्यांत आलेल्या अधिनियमांखाली दिलल्या परवाना, मंजूरी किंवा मान्यतेमध्ये असलेल्या अटी किंवा शर्ती, ज्या या विनियमांच्या प्रकरण ३ मध्ये नमूद करण्यांत आलेल्या नाहीत आणि या अधिनियमांतील व त्याखली करण्यांत आलेले नियम व विनियमांतील तरतूदींशी विसंगत नाहीत, प्रभावी दिनांकाच्या दिवशी असलेल्या परवान्यांमधील विशिष्ट अटी म्हणून मानण्यांत येतील.

११.२ अधिनियमांतील कलम १४ च्या प्रथम परंतुकाखालील प्रत्येक मानीव परवानाधारक, हे विनियम अधिसूचित केल्याच्या दिनांकापासून एक (१) महिन्याच्या आंत, अधिनियम व त्याखालील नियम आणि विनियमांमधील तरतूदीस अनुरुप असे बदल किंवा सुधारणा करण्यासाठी त्याचा परवाना आयोगाकडे सादर करेल :

परंतु असे की, अधिनियमाच्या कलम १४ मधील प्रथम परंतुकांत उल्लेखलेल्या मानीव परवानाधारकाचा परवाना आयोग, कोणतेही न्यायालय, न्यायाधिकरण, लवाद किंवा कोणतेही अन्य प्राधिकरण यांच्यापुढे प्रभावी दिनांकाच्या दिवशी जोपर्यंत न्याय-प्रविष्ट असेल, ज्यांत मानीव परवानाधारक एक पक्षकार असेल, तोपर्यंत असा मानीव परवानाधारक हा आयोग, कोणतेही न्यायालय, न्यायाधिकरण, लवाद किंवा कौणतेही अन्य प्राधिकरण यांनी दिलेल्या आदेश किवा निदेशाच्या संदर्भांत, जोपर्यंत आयोग, कोणतेही न्यायालय, न्यायाधिकरण, लवाद किंवा कौणतेही अन्य प्राधिकरण अंतिम आदेश किंवा निदेश देत नाही तोपर्यंत, 'जैसे थे' परिस्थिती कायम ठेवेल:

परंतु आणखी असे की, परवान्यांत कोणताही असा बदल किंवा सुधारणा, अधिनियम आणि त्याखालील नियम व विनियमांतील तरतुदींना आणि वर प्रथम परंतुकांत उल्लेखलेले आयोग, कोणतेही न्यायालय, न्यायाधिकरण, लवाद किंवा कौणतेही अन्य प्राधिकरण यांनी दिलेल्या अंतिम आदेश किंवा निदेशास, अनुसरून केला जाईल.

परंतु आणखी असेही की, परवानाधारकाच्या संमतीविना, जर आयोगाच्या मते अशी संमती परवानाधारकाने अवाजवीरित्या रोखून धरली नसेल तर, कोणताही असा बदल किंवा सुधारणा करण्यात येणार नाही.

११.३ जेथे अधिनियमाच्या कलम १७२ च्या खंड (a) खाली राज्य शासनाने अधिसूचना जारी केली आहे तेथे त्या अधिसूचनेत नमूद केलेल्या कालावधीकरिता या विनियमांतील कार्यपध्दतीस अनुसरून परवाना घेण्याची गरज मंडळास राहणार नाही.

११.४ अधिनियमाच्या भाग १३ नुसार राज्य शासनाने जर हस्तांतरण योजना प्रसिध्द केली असेल तर अशा हस्तांतरण योजनेद्वारे मालमत्ता, मालमत्तेत स्वारस्य, हक्क व जबाबदा-या सोपविलेल्या शासकीय कंपनी किंवा कंपनीस या विनियमांत परवाना मिळण्यासाठी नमूद केलेल्या कार्यपध्दतीचे पालन करण्याची गरज राहणार नाही.

## प्रकरण ३: परवान्याच्या अटी व शर्ती

### १२ सर्वसाधारण

१२.१ प्रत्येक वितरण परवानाधारक, या विनियमांतील अनुसूची २ मधील परवान्याच्या सर्वसाधारण आणि विषिष्ट अटींच्या, अधीन राहील.

१२.२ एका परवान्यास किंवा परवान्यांच्या एका वर्गास लागू करण्यासाठी आयोग कोणत्याही इतर विशिष्ट अटी विनिर्दिष्ट करु शकेल आणि अशा अटी या अशा परवान्याच्या अटी म्हणून मानण्यांत येतील.

परंतु असे की, एकाच क्षेत्रांत, दोन किंवा अधिक व्यक्तींच्या स्वतःच्या वितरण यंत्रणेतून विजेचे वितरण करण्यासाठी त्यांच्यातील स्पर्धेस उत्तेजना देण्याच्या हेतूने आयोग त्यास उचित वाटेल अशा परवान्याच्या अतिरिक्त अटी विनिर्दिष्ट करु शकेल.

परंतु असे की, अशा अतिरिक्त अटी विनिर्दिष्ट करण्यपूर्वी आयोग अशा अतिरिक्त अटींच्या संदर्भांत मते मांडण्यासाठी वाजवी संधी देईल..

१३. **पुरवठ्याचे क्षेत्र**

वितरण परवानाधारकाचे पुरवठ्याचे क्षेत्र परवान्यांत विहीत केलेले क्षेत्र असेल.

**१४. परवान्याचा प्रारंभ व कालावधी**

अधिनियमाखाली आणि या विनियमांना अनुसरून देण्यांत आलेला परवाना त्यांत नमूद केलेल्या तारखेपासून अंमलांत येईल आणि अधिनियमाच्या कलम १९ मधील तरतूदींना अनुसरून आयोगाने जर तो आधीच रद्द केला नाही तर तो अधिनियमाच्या कलम १५ च्या उप-कलम (८) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीपर्यंत अंमलांत राहील.

**१५. कर्तव्ये**

१५.१ वितरण परवानाधारक हा अधिनियमातील लागू असणा-या सर्व तरतूदींचे, त्याखाली विहीत करण्यांत आलेले नियम आणि सर्व विनियम, आयोगाने वेळोवळी दिलेले आदेश आणि निदेश, यांचे पालन करेल.

१५.२ वितरण परवानाधारक, जितके व्यवहार्य असेल तितके लवकर, आयोगास कळवेल -

(अ) अधिनियम, त्याखालील नियम आणि विनियम, आयोगाने दिलेले निदेश किंवा आदेश, करार किंवा परवाना यानुसार वितरण परवानाधारकावर येणा-या जबाबदा-या पार पाडण्याच्या त्याच्या क्षमतेवर परिणाम करेल असा परिस्थितीतील कोणताही लक्षणीय बदल;

(ब) अधिनियम, त्याखालील नियम आणि विनियम, आयोगाने दिलेले निदेश किंवा आदेश, करार किंवा परवाना यांचा कोणताही महत्वाचा भंग, किंवा त्याची संभाव्य शक्यता, जी त्यास पुरेशी माहित होती, व्यवहार्य असेल तितके लवकर, त्याबाबतच्या कारणांसह; आणि

(क) व्यवस्थापकीय नियंत्राणांतील कोणताही बदल किंवा वितरण परवानाधारकाच्या भाग-धारणेतील महत्वाचा बदल.

खुलासा १ : या विनियमांच्या प्रयोजनार्थ, "व्यवस्थापकीय नियंत्रण" यामध्ये भाग-भांडवल धारण केल्यामुळे किंवा व्यवस्थापकीय अधिकारामुळे किंवा भागधारकातील करारामुळे किंवा भागिदारी करारामुळे किंवा विश्वस्त करारामुळे किंवा मतदान करारामुळे किंवा अन्य कोणत्याही प्रकारे मिळणा-या अधिकारासह, बहुसंख्य संचालकांची नियुक्ति करण्याचा किंवा व्यवस्थापनाचे किंवा वितरण परवानाधारकाच्या धोरणात्मक निर्णयाचे नियंत्रण करण्याच्या अधिकाराचा समावेश राहील.

खुलासा २ : या विनियमाच्या प्रयोजनार्थ, “भागधारणेतील महत्त्वाचा बदल ” म्हणजे वेळोवेळी अंमलांत असलेले भारतीय रोखे व विनिमय मंडळ (SEBI) (मोठ्या प्रमाणावरील भाग खरेदी आणि उद्योग ताब्यांत घेणे (Takeovers) विनियम, १९९७, मधील विनियम ७ मध्ये विहीत केलेल्या अशा व्यक्तीने वितरण परवानाधारकाच्या इतके टक्के भागांची किंवा मतदानाच्या हक्कांची केलेली खरेदी, ज्याची त्या विनियमाच्या उप-विनियम (१) खाली माहिती उघड करणे भाग पडेल.

१५.३ परवानाप्राप्त उद्योगाच्या कामाकरिता मालमत्तेवर कर्जाचा बोजा चढविण्याशिवाय परवानाप्राप्त उद्योगाच्या मालमत्तेवर इतर कोणत्याही कारणांसाठी कर्जाचा बोजा चढविण्यापूर्वी वितरण परवानाधारक आयोगाची परवानगी घेईल.

१५.४ वितरण परवानाधारक, वितरण परवानाधारकास त्याच्या परवानाप्राप्त उद्योगाला माल व सेवा पुरविण्याकरिता त्याच्या उप कंपनीची (subsidiary company) किंवा सूत्रधार कंपनीची (holding company) किंवा अशा सूत्रधार कंपनीच्या उप कंपनीची, खालील अटींच्या अधीन राहून, नेमणूक करेल -

(अ) हा व्यवहार, जवळीक बाजूला ठेवून, त्या परिस्थितीत योग्य व वाजवी किंमतीस, ज्याचा या विनियमाच्या प्रयोजनार्थ असा अर्थ आहे की, वितरण परवानाधारकाशी संबंधित आणि निगडीत नसलेली तिसरी व्यक्ती आणि वितरण परवानाधारक यांचेमध्ये कोणत्याही विशिष्ट व्यहारासंबधांत अटी / व शर्तीनुसार ठरणारी किंमत, केला जाईल.

(ब) वितरण परवानाधारक, प्रत्येक आर्थिक वर्षांत या विनियमात उल्लेखलेल्या स्वस्र्यांचा, त्या आर्थिक वर्षांत पार पाडलेल्या व्यवहारांचा तपशील, आयोगास सादर करेल.

(क) वरील खंड (अ) मधील गरजांची पूर्तता झाली असल्याबाबत सनदी लेखापालाचे एक प्रमाणपत्र वितरण परवानाधारक प्रत्येक आर्थिक वर्षाकरिता आयोगास सादर करेल.

स्पष्टीकरण - या विनियमांच्या प्रयोजनार्थ, “उक्त कंपनी (subsidiary company)” आणि “सूत्रधार कंपनी (holding company)” या संज्ञांचा अर्थ कंपनी अधिनियम,१९५६ मधील कलम ४ प्रमाणे राहील.

१५.५ वितरण परवानाधारक पुरवठा क्षेत्रांतील विशिष्ट क्षेत्रांत अन्य व्यक्तीद्वारे विजेचे वितरण करु शकेल व या अन्य व्यक्तीस आयोगाकडून वेगळा परवाना घेण्याची गरज राहणार नाही.

परंतु असे की, अशा प्रकारे विजेचे वितरण करण्यासाठी वितरण परवानाधारकाने अन्य व्यक्तीस प्राधिकृत केले तरी वितरण परवानाधारक हा अधिनियम, नियम व विनियमांखालील त्याच्या सर्व जबाबदा-या पार पाडण्यास बांधील राहील.

परंतु आणखी असे की, या विनियमाखाली अन्य व्यक्तीबरोबर केलेल्या कोणत्याही कराराचा तपशील वितरण परवानाधारक प्रत्येक आर्थिक वर्षात आयोग ठरवेल त्या नमुन्यांत आयोगास कळवेल.

१५.६ वितरण परवानाधारक -

(अ) आयोगास आयोग विहीत करेल अशा पध्दतीने व अशा कालावधी किंवा कालावधींकरिता पुरवठा क्षेत्रांतील विजेच्या मागणीसंबधीचे तपशीलवार अंदाज तयार करेल व आयोगास सादर करेल .

(ब) आयोगाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे आणि आयोग मंजूरी देईल त्या पारदर्शक खरेदी प्रक्रियेनुसार कार्यक्षमरित्या व स्वस्त विद्युत क्षमता आणि उर्जा खरेदी करेल.

## १६. **नेटवर्क उभारणी**

वितरण परवानाधारक आयोगाने मान्यता दिलेल्या नेटवर्क उभारणी योजनेनुसारच काम करेल.

## १७. **लेखा**

१७.१ वितरण परवानाधारकाचे आर्थिक वर्ष १ एप्रिल पासून पुढील ३१ मार्चपर्यंत राहील.

१७.२ वितरण परवानाधारक परवानाप्राप्त उद्योगासाठी आणि इतर उद्योगांसाठी खालील गोष्टी करेल-

(अ) महसुल, खर्च, मालमत्ता, दायित्वे, राखीव निधी आणि तरतुदी या बाबी ज्या परवानाप्राप्त उद्योगाच्या असतील किंवा ज्यांचा त्याच्याशी रास्तपणे संबंध जोडता येईल त्या वितरण परवानाधारकाच्या पुस्तकांत स्वतंत्रपणे लक्षांत याव्यांत म्हणुन त्यासाठी आवश्यक असतील ती वाटप विवरणपत्रे ठेवेल.

ब) परवानाप्राप्त उद्योग आणि इतर उद्योग यांत संयुक्त आणि समान असलेल्या खर्चाच्या बाबींमध्ये वाजवी वाटप होण्यासाठी एक उचित व पारदर्शी खर्च वाटप पध्दती स्वीकारेल.

(क) कंपनी अधिनियम, १९५६ मधील तरतुदींनुसार आणि / किंवा भारतीय सनदी लेखापाल संस्थेच्या प्रमाणांप्रमाणे किंवा मार्गदर्शनानुसार लेखा विवरणपत्रे सातत्याने तयार करेल.

स्पष्टीकरण - परवानाप्राप्त उद्योगाच्या किंवा इतर उद्योगाच्या किंवा त्यांच्याशी वाजवी रितीने संबंध जोडता येईल अशा खर्चास किंवा दायित्वास परवान्याच्या अट १७.२ येथे केलेला संदर्भ हा कर व भांडवली दायित्व, हे प्रामुख्याने अशा उद्योगासंबंधात नसतात, आणि त्यावरील व्याज वगळून असल्याचे मानण्यांत येईल.

१७.३ वेगवेगळ्या वीज दरांच्या वर्गवारीखालील वीज पुरवठ्यावर आणि अधिनियमाच्या कलम ४२ च्या उप-कलम (२) खालील परस्पर अनुदानावरील (cross subsidy) अधिभारामुळे वितरण परवानाधारकाला किती खर्च झाला हे ठरविणे किंवा त्याचा अंदाज घेणे, जसे असेल तसे, आयोगास शक्य व्हावे म्हणून आयोग निदेश देईल त्याप्रमाणे, वितरण परवानाधारक उचित लेखा अभिलेखे ठेवेल व अभ्यास करेल.

१७.४ वितरण परवानाधारक त्याच्या लेखा विवरणपत्राची एक प्रत, कोणत्याही व्यक्तीने विनंति केल्यास त्यास, फोटोकॉपीहून जास्त खर्च येणार नाही इतक्या रास्त किंमतीस, उपलब्ध करुन देईल.

## १८. **आयोगास माहिती देण्याची तरतूद**

वितरण परवानाधारक त्याच्या परवानाप्राप्त उद्योग आणि / किंवा इतर उद्योगांच्या संदर्भांत आयोगास गरज असेल त्यानुसार माहिती, कागदपत्रे आणि तपशील आयोगास देईल.

## १९. **परवाना शुल्क**

परवाना अंमलांत असेल त्या कालावधीत किंवा आयोग वाढवेल इतक्या पुढील कालावधीत, आयोग विहीत करेल इतके परवाना शुल्क वितरण परवानाधारक प्रत्येक वर्षी एप्रिलच्या १० तारखेपर्यंत आयोगास अदा करेल.

## २०. **ग्राहक हक्क विवरणपत्र**

२०.१ वितरण परवानाधारक, परवाना अंमलांत आल्यावर तीन (३) महिन्यांत किंवा हे विनियम लागू झाल्यानंतर तीन (३) महिन्यांत, जे नंतर होईल त्याप्रमाणे, वितरण परवानाधारकाने ग्राहकांना ते ग्राहक म्हणून त्यांना असलेल्या हक्कांची माहिती विशद करुन सांगितल्याबाबत, एक ग्राहक हक्क विवरणपत्र तयार करुन आयोगास मान्यतेसाठी सादर करेल.

२०.२ ग्राहक हक्क विवरणपत्रामुळे परिणाम होण्याची शक्यता असलेल्या ग्राहकांचे, आयोगाच्या मते, जे प्रतिनिधित्व करतात अशा व्यक्ती किंवा व्यक्तींच्या संघटना यांच्याशीा सल्लामसलत करुन, जनतेचे हित लक्षांत घेऊन त्यांत आवश्यक असे फेर-बदल आयोग करेल.

२०.३ आयोगाने मान्यता दिलेल्या ग्राहक हक्क विवरणपत्राची एक प्रत, त्याचेकडून सेवा दिल्या जाणा-या सर्व ग्राहकांना, वितरण परवानाधारक विनामूल्य उपलब्ध करुन देईल.

२०.४ वितरण परवानाधारक ग्राहक हक्क विवरणपत्र त्याच्या इंटर-नेटवरील वेब-साईटवर उपलब्ध करुन देईल.

## २१. **परवान्याच्या अर्थनिश्चितीसंदर्भात निर्णय**

परवाना आणि त्यातील अटी व शर्तींची अर्थनिश्चिती आयोग ठरवेल त्याप्रमाणे राहील.

**२२. सुधारणा करण्याचे अधिकार**

आयोग़ कोणत्याही वेळी या विनियमांतील कोणत्याही तरतूदीमध्ये बदल, फेरबदल किंवा सुधारणा करु शकेल.

**२३. अडचणी दूर करण्याचे अधिकार**

या विनियमांतील कोणत्याही तरतूदीची अंमलबजावणी करताना जर काही अडचणी आल्या तर, अधिनियमांतील तरतुदींशी विसंगत नसेल अशी कोणतीही तरतूद, जी अडचणी दूर करण्यासाठी आवश्यक असेल, आयोग साधारण किंवा विशेष आदेशाने करु शकेल.

अनुसूची १

## परवाना मिळण्यासाठी करावयाच्या अर्जाचा नमूना

खाली दिलेल्या नमुन्यामध्ये अर्ज त्यासोबतच्या यादीत नमूद केलेल्या माहिती व कागदपत्रांसह करण्यांत येईल.

**अर्जाचा नमुना**
(सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, यांना पाठविण्यांत यावा)

मी / आम्ही "महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवाना अटी) विनियम, २००४" खाली वितरण परवाना मिळण्यासाठी अर्ज करीत आहोत. आम्ही येथे आमच्या अर्जाच्या संदर्भांत आवश्यक तपशील देत असून आयोग मागेल ती अन्य कोणतीही माहिती देऊ.

**सर्वसाधारण माहिती**

१. परवान्यांत असणारे नांव
२. प्राथमिक संपर्क
    अ. नांव
    ब. संपर्काचा पत्ता
    क. दूरध्वनी क्रमांक
    ड. फॅक्स क्रमांक
    इ. ई-मेल पत्ता.

**अर्जदारासंबधीची माहिती**

३. संस्थेचे पूर्ण कायदेशीर नांव
४. लागू असलेल्या कायद्याखालील नोंदणी क्रमांक
५. संस्थापनाची (incorporation) आणि नोंदणीची तारीख
६. नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता
७. प्रवर्तकांची नांवे- प्रत्येकाच्या मालकीतील टक्केवारीसह

**सहपत्रे**
खालील माहिती / कागदपत्रे योग्यरित्या जोडली आहेत :

**संस्थापन.**

८. लागू असणरी खालील संस्थापनाची कागदपत्रे -

अ. अर्जदार कंपनी असल्यास, संस्थापन ज्ञापन व संस्थापन नियमावली (Memorandum of Association and Articles of Association)

ब. अर्जदार भागिदारी संस्था असल्यास, भागिदारीचा करार

क. इतर कोणत्याही प्रकरणी, लागू असणारा करार किंवा ,असल्यास, संस्थापन सनद (charter).

**तांत्रिक माहिती**

९. व्यवस्थापन माहिती (कामकाज, योजना, वाणिज्य, अर्थविषयक, नियामक, मनुष्यबळ आणि माहिती-तंत्रक्षेत्रातील कार्यासंदर्भात)

अ. व्यक्तीचे नांव

ब. अर्जदार संस्थेतील पद

क. अर्हता

ड. नैपुण्याचे (expertise) क्षेत्र

इ. अनुभव

१०. विजेचे वितरण करणे शक्य व्हावे म्हणून ज्या प्रत्यक्ष किंवा प्रस्तावित ठिकाणी विद्युत वाहिन्या आणि विद्युत संयंत्र (plant) उभे करावयाचे आहे त्या ठिकाणाचे पुरेसे वर्णन ज्यांत कोणते संयंत्र आणि वाहिन्या उभारलेल्या आहेत आणि कोणते संयंत्र आणि वाहिन्या उभारावयाच्या आहेत, आणि अर्ज कोणत्या क्षेत्रासाठी आहे, याबाबतची माहिती.

११. वितरणाच्या प्रस्तावित क्षेत्राचा, १० सेंटिमीटर बरोबर १ किलॊमीटर यापेक्षा कमी नसलेल्या स्केलवर, सविस्तर नकाशा किंवा नकाशे आणि जर असे नकाशे उपलब्ध नसतील तर सर्वात मोठ्या स्केलवरील उपलब्ध असलेल्या शासकीय (ordnance) नकाशापेक्षा कमी नसेल अशा स्केलवरील नकाशा, ज्यांत अर्जदाराची प्रस्तावित वितरण यंत्रणा दाखविण्यांत आली असेल.

१२ प्रस्तावित पुरवठ्याच्या क्षेत्रातील संरक्षणाच्या हेतूने शासनाच्या पूर्णतः किंवा अशतः ताब्यांत असलेली छावणी, विमानतळ, गढी, दारुगोळा कारखाना, डॉकयार्ड किंवा तळ किंवा कोणतीही ईमारत किंवा जागा यांची यादी.

१३ रस्ते किंवा रस्त्यांचा काही भाग जो केंद्र शासन, राज्य शासन किंवा स्थानिक प्राधिकरण यांच्याऐवजी अन्य व्यक्तीने दुरुस्त करावयाचा आहे त्यांची, आणि रेल्वे, ट्रॅमवे, धरणे आणि जलमार्ग जेथे काम करण्यासाठी अर्जदाराने प्राधिकारपत्र मिळविले आहे त्यांची, यादी.

**आर्थिक माहिती**

१४. असल्यास, लेखा परिक्षकाच्या अहवालासह सर्वांत अलिकडची तीन वर्षांची लेखा विवरणपत्रे.

१५. पुढील पांच वर्षाकरिता गुंतवणुकीचा आराखडा व नेटवर्क उभारणीची योजना ज्यांत वितरण यंत्रणेच्या उभारणीचा वर्षवार आणि क्षेत्रवार कार्यक्रम दाखविण्यांत आला असेल.

**इतर सहपत्रे**

१६. परवाना अर्जावरील प्रक्रिया शुल्काच्या पावतीची प्रत.

१७. लागू असल्यास, केंद्र शासनाने अतिरिक्त माहिति मागितली असल्यास तिची पूर्तता केली असल्यास त्याच्या समर्थनार्थ माहिती.

मी / आम्ही प्रमाणित करतो की, याद्वारे सादर केलेला तपशील सादर करण्याच्या वेळी माझ्या / आमच्या ज्ञान व विश्वासानुसार सत्य, पूर्ण आणि बरोबर आहे व त्यांत महत्वाच्या वस्तुस्थितीबाबत कोणतेही असत्य विधान नाही व यांत नमूद केलेले विधान / तपशील दिशाभूल करणारा होऊ नये म्हणून आवश्यक असणारी महत्वाची वस्तुस्थिती नमूद करण्याचे वगळण्यांत आलेले नाही.

| | |
|---|---|
| ठिकाण : | सही |
| तारीख : | नांव व पदनाम<br>मोहोर |

अनुसूची २

## परवान्याचा नमुना

--------------------------------------- ज्यांचे नोंदणीकृत कार्यालय ----------- येथे आहे, यांना पुरवठ्याच्या क्षेत्रांत (या परवान्यांत व्याख्या केल्याप्रमाणे) विजेचे वितरण करण्यासाठी व याद्वारे विनिर्दिष्ट केलेल्या अधिकारांसह आणि अटी व शर्तीवर विद्युत अधिनियम, २००३ (२००३ चा ३६) च्या कलम १४ खाली महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दिलेला परवाना.

### भाग १ : सर्वसाधारण

### १. संक्षिप्त शिर्षक

या परवान्याला ....................वितरण परवाना (.........चा परवाना क्र...) असे म्हणावे.

### २. व्याख्या

या परवान्यांत, संदर्भानुसार वेगळा अर्थ अपेक्षित नसेल तर -

(अ) **"लेखा विवरणपत्र"** म्हणजे प्रत्येक आर्थिक वर्षाकरिता परवानाप्राप्त उद्योग आणि इतर उद्योगांकरिता वेगवेगळी तयार केलेली व खालील बाबींचा समावेश असलेली लेखा विवरणपत्रे -

(१) कंपनी अधिनियम, १९५६ च्या अनुसूची ६ च्या भाग १ मधील मधील नमुन्याप्रमाणे तयार केलेला ताळे-बंद;

(२) कंपनी अधिनियम,१९५६ च्या अनुसूची ६च्या भाग २ मधील मधील अटींची पुर्तता करुन तयार केलेले नफा-तोटा पत्रक;

(३) भारतीय सनदी लेखापाल संस्थेच्या रोकड आवक (cash flow) विवरणपत्रासाठी असलेल्या लेखा प्रमाणांवर (AS-3) आधारित तयार केलेले रोकड आवक विवरणपत्र;

(४) वितरण परवानाधारकाच्या वैधानिक लेखापरिक्षकाचा अहवाल;

(५) कंपनी अधिनियम, १९५६ च्या कलम २०९(१)(डी) खाली केंद्र शासनाने विहीत केलेले खर्चाचे अभिलेखे.

यांसह त्यासंबधीच्या टिपण्या, व आयोग वेळोवळी निदेश देईल त्यानुसार इतर सहाय्यक विवरणपत्रे व माहिती.

(ब) **"वाटप विवरणपत्र"** म्हणजे प्रत्येक आर्थिक वर्षासाठी वितरण परवानाधारकाच्या प्रत्येक स्वतंत्र उद्योगासाठी तयार करण्यांत आलेले एक विवरणपत्र ज्यांत, दाखविण्यांत आलेला महसूल, खर्च, मालमत्ता,दायित्वे, राखीव निधी किंवा तरतूद जी -

(१) इतर कोणत्याही उद्योगांना किंवा उद्योगांकडून खर्ची टाकण्यांत आली आहे व ज्या आधारे ती खर्ची टाकण्यांत आली त्याचा तपशील, किंवा

(२) वितरण परवानाधारकाचा वितरण उद्योग व इतर कोणताही उद्योग़ यांमध्ये विभाजनाने किंवा वाटप करुन ठरविण्यांत आली आहे व असे विभाजन किंवा वाटप ज्या आधारे करण्यांत आले त्याचा तपशील, देण्यांत आला आहे;

(क) **"अधिनियम"** म्हणजे विद्युत अधिनियम, २००३ (२००३ चा ३६);

(ड) **"आयोग"** महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग;

(इ) **"वितरण परवानाधारक"** म्हणजे .............. परवानाप्राप्त उद्योगाचा चालक म्हणून.

(फ) **"परवाना"** म्हणजे हा परवाना ज्याखाली वितरण परवानाधारकाला परवानाप्राप्त उद्योग करण्यासाठी प्राधिकृत करण्यांत आले आहे.

(गः) **"परवानाप्राप्त उद्योग"** म्हणजे वितरण परवानाधरकाच्या वीज पुरवठ्याच्या क्षेत्रातील ग्राहकांना वीज पुरविण्यासाठी वितरण यंत्रणा कार्यान्वित ठेवण्याचा व सुव्यवस्थित राखण्याचा उद्योग.

(ह) **"नेटवर्क उभारणीची योजना"** म्हणजे वितरण परवानाधरकाची किंवा अर्जदाराची प्रस्तावित वितरण यंत्रणा, जसे असेल तसे, कशी पसरली आहे ते दाखवणारा आराखडा ज्यांत अशा वितरण यंत्रणेची भौगोलिक व्याप्ति, टप्प्या-टप्प्याने होणारी वाढ व आयोगास आवश्यक असणारा असा इतर तपशील समाविष्ट असेल.

(ई) **"इतर उद्योग"** म्हणजे अधिनियमाच्या कलम ५१ मध्ये उल्लेख केलेला असा इतर उद्योग;

यांत वापरलेले आणि व्याख्या न केलेले शब्द किंवा शब्दप्रयोग यांना अधिनियमांत नमूद केल्यानुसार अर्थ राहील.

## भाग २ : सर्वसाधारण अटी व शर्ती

### ३. पुरवठ्याचे क्षेत्र

खालील्प्रमाणे सीमांकित करण्यांत आलेले संपुर्ण क्षेत्र हे पुरवठ्याचे क्षेत्र राहील :

उत्तर ------------------ ने
पूर्व -------------------- ने
दक्षिण ----------------- ने
पश्चिम ----------------- ने

## ४. परवान्याचा प्रारंभ आणि अटी

परवाना हा .......चा ........दिवस ........ रोजी अंमलांत येईल व जर तो अधिनियमाच्या कलम १९ खाली आयोगाने आधीच रद्द केला नाही तर तो अधिनियमाच्या कलम १५ च्या उप-कलम (८) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीपर्यंत अंमलांत राहील.

## ५. कर्तव्ये

५.१ वितरण परवानाधारक हा अधिनियमातील लागू असणा-या सर्व तरतूदींचे, त्याखाली विहीत करण्यांत आलेले नियम आणि सर्व विनियम, आयोगाने वेळोवळी दिलेले आदेश आणि निर्देश, यांचे पालन करेल.

५.२ वितरण परवानाधारक, जितके व्यवहार्य असेल तितके लवकर, आयोगास खालील बाबी कळवेल-

(अ) अधिनियम, त्याखालील नियम आणि विनियम, आयोगाने दिलेले निदेश किंवा आदेश, करार किंवा परवाना यानुसार वितरण परवानाधारकावर येणा-या जबाबदा-या पार पाडण्याच्या त्याच्या क्षमतेवर परिणाम करेल असा परिस्थितीत होणारा कोणताही लक्षणीय बदल;

(ब) अधिनियम, त्यााखालील नियम आणि विनियम, आयोगाने दिलेले निदेश कि वा आदेश, करार किंवा परवाना यांचा कोणताही महत्वाचा भंग, किंवा त्याची संभाव्य शक्यता, जी त्यास पुरेशी माहिति होती, व्यवहार्य असेल तितके लवकर, त्याबाबतच्या कारणांसह; आणि

(क) व्यवस्थापकीय नियंत्राणांतील कोणताही बदल किंवा वितरण परवानाधारकाच्या भाग-धारणेतील महत्वाचा बदल.

खुलासा १ : या विनियमांच्या प्रयोजनार्थ, “व्यवस्थापकीय नियंत्रण” यामध्ये भाग-भांडवल धारण केल्यामुळे किंवा व्यवस्थापकीय अधिकारामुळे किंवा भागधारकातील करारामुळे किंवा भागिदारी करारामुळे किंवा विश्वस्त करारामुळे किंवा मतदान करारामुळे किंवा अन्य कोणत्याही प्रकारे मिळणा-या अधिकारासह, बहुसंख्य संचालकांची नियुक्ति करण्याचा किंवा व्यवस्थापनाचे किंवा वितरण परवानाधारकाच्या धोरणात्मक निर्णयाचे नियंत्रण करण्याच्या अधिकाराचा समावेश राहील.

खुलासा २ : या विनियमाच्या प्रयोजनार्थ, “भागधारणेतील महत्त्वाचा बदल” म्हणजे वेळोवेळी अंमलांत असलेले भारतीय रोखे व विनिमय मंडळ (SEBI) (मोठ्या प्रमाणावरील भाग खरेदी आणि उद्योग ताब्यांत घेणे (Takeovers) ) विनियम, १९९७, मधील विनियम ७ मध्ये विहीत केलेल्या अशा व्यक्तीने वितरण परवानाधारकाच्या इतके टक्के भागांची किंवा मतदानाच्या हक्कांची केलेली खरेदी, ज्याची त्या विनियमाच्या उप-विनियम (१) खाली माहिती उघड करणे भाग पडेल.

५.३ परवानाप्राप्त उद्योगाच्या कामाकरिता मालमत्तेवर कर्जाचा बोजा चढविण्याशिवाय परवानाप्राप्त उद्योगाच्या मालमत्तेवर इतर कोणत्याही कारणांसाठी कर्जाचा बोजा चढविण्यापूर्वी वितरण परवानाधारक आयोगाची परवानगी घेईल.

५.४ वितरण परवानाधारक, वितरण परवानाधारकास परवानाप्राप्त उद्योगासाठी माल व सेवा पुरविण्याकरिता त्याच्या उप कंपनीची (subsidiary company) किंवा सूत्रधार कंपनीची (holding company) किंवा अशा सूत्रधार कंपनीच्या उप कंपनीची, खालील अटींच्या अधीन राहून, नेमणूक करेल.

(अ) हा व्यवहार, जवळीक बाजूला ठेवून, त्या परिस्थितीत योग्य व वाजवी किंमतीस, ज्याचा या विनियमाच्या प्रयोजनार्थ असा अर्थ आहे की, वितरण परवानाधारकाशी संबंधित आणि निगडीत नसलेली तिसरी व्यक्ती आणि वितरण परवानाधारक यांचेमध्ये कोणत्याही विशिष्ट व्यहारासंबधांत अटी / व शर्तीनुसार ठरणारी किंमत, केला जाईल.

(ब) वितरण परवानाधारक, प्रत्येक आर्थिक वर्षांत या विनियमांत उल्लेखलेल्या स्वस्पांचा, त्या आर्थिक वर्षांत पार पाडलेल्या व्यवहारांचा तपशील, आयोगास सादर करेल.

(क) वरील खंड (अ)मधील गरजांची पूर्तता झाली असल्याबाबत सनदी लेखापालाचे एक प्रमाणपत्र वितरण परवानाधारक प्रत्येक वर्षाकरिता आयोगास सादर करेल.

स्पष्टीकरण - या विनियमांच्या प्रयोजनांकरिता, "उप कंपनी (subsidiary company)" आणि "सूत्रधार कंपनी (holding company)" या संज्ञांचा अर्थ कंपनी अधिनियम,१९५६ मधील कलम ४ प्रमाणे राहील.

५.५ वितरण परवानाधारक पुरवठा क्षेत्रांतील विशिष्ट क्षेत्रांत अन्य व्यक्तीद्वारे विजेचे वितरण करु शकेल व या अन्य व्यक्तीस आयोगाकडून वेगळा परवाना घेण्याची गरज राहणार नाही

परंतु असे की, अशा प्रकारे विजेचे वितरण करण्यासाठी वितरण परवानाधारकाने अन्य व्यक्तीस प्राधिकृत केले तरी वितरण परवानाधारक हा अधिनियम, नियम व विनियमांखालील त्याच्या सर्व जबाबदा-या पार पाडण्यास बांधील राहील.

परंतु आणखी असे की, या विनियमाखाली अन्य व्यक्तीबरोबर केलेल्या कोणत्याही कराराचा तपशील वितरण परवानाधारक प्रत्येक आर्थिक वर्षांत आयोग ठरवेल त्या नमुन्यांत आयोगास कळवेल.

५.६ वितरण परवानाधारक -

(अ) आयोगास आयोग विहीत करेल अशा पध्दतीने व अशा कालावधी किंवा कालावधींकरिता पुरवठा क्षेत्रांतील विजेच्या मागणीसंबधीचे तपशीलवार अंदाज तयार करेल व आयोगास सादर करेल .

(ब) आयोगाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे आणि आयोग मंजूरी देईल त्या पारदर्शक खरेदी प्रक्रियेनुसार कार्यक्षमरित्या व स्वस्त विद्युत क्षमता आणि उर्जा खरेदी करेल.

## ६. रस्त्यावरील कामे

खालील रस्ते किंवा रस्त्यांचा काही भाग जो केंद्र शासन, राज्य शासन किंवा स्थानिक प्राधिकरण यांच्याऐवजी अन्य व्यक्तीने दुरुस्त करावयाचा आहे, आणि रेल्वे, ट्रॅमवे, धरणे आणि जलमार्ग किंवा त्यांचा काही भाग, येथे काम करण्यासाठी वितरण परवानाधारक प्राधिकृत आहे,

(अ) रस्ते.
(ब) रेल्वे.
(क) ट्रॅमवेज
(ड) धरणे
(इ) जलमार्ग.

## ७. नेटवर्क उभारणी

वितरण परवानाधारक आयोगाने मान्यता दिलेल्या नेटवर्क उभारणी कार्यक्रमानुसरच काम करेल.

## ८. लेखा

८.१ वितरण परवानाधारकाचे आर्थिक वर्ष १ एप्रिल पासून पुढील ३१ मार्चपर्यंत राहील.

८.२ वितरण परवानाधारक परवानाप्राप्त उद्योगासाठी आणि इतर उद्योगासाठी खालील गोष्टी करेल -

(अ) महसुल, खर्च, मालमत्ता, दायित्वे, राखीव निधी आणि तरतुदी या बाबी ज्या परवानाप्राप्त उद्योगाच्या असतील किंवा ज्यांचा त्याच्याशी रास्तपणे संबंध जोडता येईल त्या वितरण परवानाधारकाच्या पुस्तकांत स्वतंत्रपणे लक्षांत याव्यांत म्हणुन त्यासाठी आवश्यक असतील ती वाटप विवरणपत्रे ठेवेल.

(ब) परवानाप्राप्त उद्योग आणि इतर उद्योग यांत संयुक्त आणि समान असलेल्या खर्चाच्या बाबींमध्ये वाजवी वाटप होण्यासाठी एक उचित व पारदर्शी खर्च वाटप पध्दती स्वीकारेल.

(क) कंपनी अधिनियम, १९५६ मधील तरतुदींनुसार आणि / किंवा भारतीय सनदी लेखापाल संस्थेच्या प्रमाणांप्रमाणे किंवा मार्गदर्शनानुसार लेखा विवरणपत्रे सातत्याने तयार करेल.

स्पष्टीकरण - परवानाप्राप्त उद्योगाच्या किंवा इतर उद्योगाच्या किंवा त्यांच्याशी वाजवी रितीने संबंध जोडता येईल अशा खर्चास किंवा दायित्वास परवान्याच्या अट ८.२ येथे केलेला संदर्भ हा कर व भांडवली दायित्व, हे प्रामुख्याने अशा उद्योगासंबंधात नसतात, आणि त्यावरील व्याज वगळून असल्याचे मानण्यांत येईल.

८.३ वेगवेगळ्या वीज दरांच्या वर्गवारीखालील वीज पुरवठ्यावर आणि अधिनियमाच्या कलम ४२ च्या उप-कलम (२) खालील परस्पर अनुदानावरील (cross subsidy) अधिभारामुळे वितरण परवानाधारकाला किती खर्च झाला हे ठरविणे किंवा त्याचा अंदाज घेणे, जसे असेल तसे, आयोगास शक्य व्हावे म्हणून आयोग निदेश देईल त्याप्रमाणे, वितरण परवानाधारक उचित लेखा अभिलेखे ठेवेल व अभ्यास करेल.

८.४ वितरण परवानाधारक त्याच्या लेखा विवरणपत्राची एक प्रत, कोणत्याही व्यक्तीने विनंति केल्यास त्यास, फोटोकॉपीहून जास्त खर्च येणार नाही इतक्या रास्त किंमतीस, उपलब्ध करुन देईल.

## ९. आयोगास माहिती देण्याची तरतूद

वितरण परवानाधारक त्याच्या परवानाप्राप्त उद्योग आणि / किंवा इतर उद्योगांच्या संदर्भात आयोगास गरज असेल त्यानुसार माहिती, कागदपत्रे आणि तपशील आयोगास देईल.

## १०. परवाना शुल्क

परवाना अंमलांत असेल त्या कालावधीत किंवा आयोग वाढवेल इतक्या पुढील कालावधीत, आयोग विहीत करेल इतके परवाना शुल्क वितरण परवानाधारक प्रत्येक वर्षी एप्रिलच्या १० तारखेपर्यंत आयोगास अदा करेल.

## ११. ग्राहक हक्क विवरणपत्र

११.१ वितरण परवानाधारक, परवाना अंमलांत आल्यावर तीन (३) महिन्यांत किंवा हे विनियम लागू झाल्यानंतर तीन (३) महिन्यांत, जे नंतर होईल त्याप्रमाणे, वितरण परवानाधारकाने ग्राहकांना ते ग्राहक म्हणून त्यांना असलेल्या हक्कांची माहिती विशद करुन सांगितल्याबाबत, एक ग्राहक हक्क विवरणपत्र तयार करुन आयोगास मान्यतेसाठी सादर करेल.

११.२ ग्राहक हक्क विवरणपत्रामुळे परिणाम होण्याची शक्यता असलेल्या ग्राहकांचे, आयोगाच्या मते, जे प्रतिनिधित्व करतात अशा व्यक्ती किंवा व्यक्तींच्या संघटना यांच्याशी आयोग सल्लामसलत करुन, जनतेचे हित लक्षांत घेऊन त्यांत आवश्यक असे फेर-बदल आयोग करेल.

११.३ आयोगाने मान्यता दिलेल्या ग्राहक हक्क विवरणपत्राची एक प्रत, त्याचेकडून सेवा दिल्या जाणा-या सर्व ग्राहकांना, वितरण परवानाधारक विनामूल्य उपलब्ध करुन देईल.

११.४ वितरण परवानाधारक ग्राहक हक्क विवरणपत्र त्याच्या इंटर-नेटवरील वेब-साईटवर उपलब्ध करुन देईल.

**१२. परवान्याच्या अर्थनिश्चितीसंदर्भात निर्णय**

परवाना आणि त्यातील अटी व शर्तींची अर्थनिश्चिती आयोग ठरवेल त्याप्रमाणे राहील.

## भाग ३ : विशिष्ट अटी व शर्ती

मुंबई:
दिनांकः १० जून, २००४.

**ए. एम. खान,**
सचिव.
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई